



दैनिक

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

# अक्षराज

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे   Email : newsaksharaj2021@gmail.com



## आतील पानात...

- कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त...
- दिबांचे नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे...?
- गर्लफ्रेंडचे चोचले पुरवण्यासाठी २० वर्षीय देवेशने केलं मोठं कांड...



● वर्ष ०२ रे ● अंक ३५१ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये ● ठाणे, शुक्रवार, दि.१० ऑक्टोबर २०२५ ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 02 ● ISSUE : 351 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 ● THANE, Friday, 10 October 2025 ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## लाडक्या बहिणींची दिवाळी गोड!

### सप्टेंबरचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा...




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा हप्ता देण्यासाठी ४१०.३० कोटी रुपयांच्या निधीला वित्त विभागाने बुधवारी मंजुरी दिली. त्यामुळे राज्यभरातील पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर म हिन्याचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अनूसुचित जाती घटकांकरिता पात्र लाभार्थ्यांसाठी हा निधी असणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. हा निधी मंजूर करताना सामाजिक न्याय विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनाचा लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना करण्यात आली आहे.

राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय बुधवारी जाहीर केला आहे. या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी विभागाअंतर्गत ३,९६० कोटी इतका नितव्यय मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर वित्त विभागाने सप्टेंबर महिन्यातील पात्र लाभार्थी महिलांना हप्ता देण्यासाठी एक पत्र काही दिवसांपूर्वी पाठवत निधी वितरणीची कार्यप्रणाली ठरवून दिली आहे. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर म हिन्याचा हप्ता देण्यासाठी निधीला अर्थ विभागाने बुधवारी मंजुरी दिली.

या निधीला मंजुरी देताना सामाजिक न्याय विभागाने एक महत्वपूर्ण सूचना महिला व बालविकास विभागाला केली आहे. त्यानुसार अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध प्रवर्गातील महिला लाभार्थी संख्या उपलब्ध करुन देण्याची सूचना केली. त्याचबरोबर उपलब्ध निधीचा वापर हा अनूसुचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी होईल, याची दक्षता घेण्याची सूचना केली. त्याशिवाय विभागाअंतर्गत संजय गांधी निराधर योजना , श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्त वेतन योजनांतर्गतील पात्र लाभार्थ्यांना लाडकी बहिण योजनेचा हप्ता मिळणार नाही, याची सूचनाही केली.

## महाराष्ट्रात १६ लाख कोटींची गुंतवणूक : उदय सामंत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी अत्यंत चांगलं वातावरण आहे. विश्व आर्थिक मंचावर महाराष्ट्राने इलेक्ट्रिक वाहन, सेम िकंडक्टर, लॉजिस्टिक्स, नवीकरणीय ऊर्जेसहीत विविध क्षेत्रात आघाडीच्या वैश्विक कंपन्यांसोबत १६ लाख कोटींची गुंतवणूक मिळवली आहे. एवढी मोठी गुंतवणूक केवळ गुंतवणूकदारांचा विश्वासावर नव्हे तर धोरणात्मक तत्परता आणि महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा किती मजबूत आहे, हेच दाखवतो, असं महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटलं.




आज जर्मनी येथे आयोजित News9 Global Summit कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत ह्यांनी उपस्थिती दर्शवली. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील वाढत्या गुंतवणुकीकडे जर्मनीचं लक्ष वेधलं. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत-जर्मनी सहकार्य आणि संवादासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ म्हणून हे News9 Global Summit उल्लेखनीय ठरणार आहे. MIDC मार्फत परदेशात राहणाऱ्या मराठी बांधवांसाठी ५०० एकर जमीन राखीव ठेवण्यात आली आहे, जेणेकरून तेही आपल्या म ातृभूमीत उद्योग उभारू शकतील आणि मायदेशी परतू शकतील, असं उदय सामंत म्हणाले.

**महाराष्ट्र नंबर वन !**

आज देशात होणाऱ्या गुंतवणुकीत महाराष्ट्र क्रमांक एकवर आहे. गेल्या काही वर्षांत, World Economic Forum (WEF) दावोस येथे म हाराष्ट्राने २० लाख हजार कोटींहून अधिक मूल्याच्या सामंजस्य करारांवर (MoU)स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हे महाराष्ट्राच्या उद्योग धोरणांच्या यशाचे आणि गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे मोठे उदाहरण आहे, असं सामंत यांनी सांगितलं.

हा यशस्वी प्रवास सरकारने निर्माण केलेल्या पोषक उद्योग वातावरणामुळे शक्य झाला आहे. उद्योजकांना दिल्या जाणाऱ्या विविध योजना, सबसिडी, प्रोत्साहनपर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वेगवान निर्णय प्रक्रिया यामुळे आज महाराष्ट्र जगातील आघाडीच्या गुंतवणूक केंद्रांपैकी एक बनला आहे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. या कार्यक्रम ात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ऑनलाइन उपस्थित होते. तसेच माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर, नीती आयोगचे सदस्य आणि अर्थतज्ज्ञ अरविंद वीरमानी, टीव्ही९ नेटवर्कचे एमडी आणि सीईओ बरून दास आदी मान्यवर उपस्थित होते.

## ठाणे जिल्ह्यात उभं राहतय मोठ्ठ हब ! तब्बल १७६ गावांचा होणार कायापालट...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०९, ठाणे :** मुंबईनंतर आता मुंबई शहराच्या वेशीवर असलेल्या ठाणे शहराचाही झपाट्याने विकास होतोय. अलीकडेच ठाणे शहरात मेट्रो धावली लवकरच मेट्रोच्या फ ेऱ्यादेखील सुरू होती. इतकंच नव्हे तर समृद्धी महामार्गाची सुरुवातदेखील ठाण्यातील आमने येथे होत आहे. याच आमने येथे ग्रोथ सेंटर उभारण्यात येणार आहे.या ग्रोथ सेंटरमध्ये नव्याने १३० गावांचा समावेश करण्यात येणार आहे. अलीकडेच राज्य सरकारने या प्रकल्पाला मान्यता दिली आहे.

आमने ग्रोथ सेंटरमध्ये एकूण १७६ गावांचा समावेश आहे.४८३ चौरस किमी क्षेत्रासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून काम करणार आहे.

राज्य सरकारने ठाणे जिल्ह्यातील कल्याण आणि भिवंडी तालुक्यातील ४६ गावांसाठी सप्टेंबर २०२४मध्ये एमएसआरडीसीची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली होती. त्यावेळी १०९ चौरस किमी क्षेत्रासाठी एमएसआरडीसीची नियुती करण्यात आली होती. आता यात अनगाव सापे विकास केंद्रातील १३० गावांच्या ३७४ चौ किमी क्षेत्राचा नव्याने सम ावेश करण्यात आला आहे.

भिवंडी तालुक्यातील १४८ व कल्याणमधील २८ गावांसाठी एम एसआरडीसी नियोजन प्राधिकरण म्हणून काम करणार आहे. मुंबईतील नरिमन पॉइंट, बीकेसी, सीप्झसारखेच हे महत्त्वाकांक्षी ग्रोथ सेंटर असणार आहे. भिवंडीतील १४८ व कल्याणम धील २८ गावांसाठी एमएसआरडीसी नियोजन प्राधिकरण म्हणून काम करेल.

दरम्यान आमने भागातील १७६ गावांमध्ये उभारण्यात येणाऱ्या ग्रोथ सेंटरमध्ये इंडस्ट्रिअल पार्क, लॉजिस्टिक हब, टेक्सटाइल पार्क, फार्मा अँड बायटेक पार्क, फुड प्रोसेसिंग पार्क, इनोव्हेशन पार्क, मेडिसिटी, स्पोर्ट्स अँड रिक्रीएशन हब, हेल्थकेअर क्लस्टर, अॅग्रीकल्चर हब, होलसेल ट्रेड सेंटर यांचा समावेश असेल. इतकंच नव्हे तर रहिवासी आणि व्यावसायिक इमारती, थिम बेस पार्क यांचाही सम ावेश असेल. त्याचबरोबर या भागाचा ट्रान्सिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट पद्धतीने विकास साधला जाणार आहे.

## कार्यालयातील परिसरात जाऊ द्या, अन्यथा...; अमोल कोल्हे संतापले...




### ट्रॅफिकमुक्त चाकणसाठी एल्गार !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, पुणे :** मुंबईनंतर आता पुण्यातील वाहतूक कोंडी ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील मोठी समस्या बनली आहे. विशेषतः सणासुदीच्या दिवसांत शहरात आणि औद्योगिक परिसरांमध्ये प्रचंड गर्दी होत असून, दोन ते तीन तास वाहनचालकांना कोंडीत अडकून पडावे लागते. याच पार्श्वभूमीवर ट्राफिक मुक्त चाकण कृती समिती, ग्रामस्थ आणि एमआयडीसीतील कामगारांनी आज गुरुवारी रस्त्यावर उतरून संताप व्यक्त करत आंदोलन केलं.

वाहतूक कोंडीसह इतर पायाभूत सुविधांच्या मागणीसाठी नागरिकांनी PMRDA कार्यालयावर धडक मोर्चा काढला. या मोर्चात खासदार अमोल कोल्हे आमदार बाबाजी काळे आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

मोर्चादरम्यान खासदार अमोल कोल्हे यांनी प्रतिनिधीमंडळाला पीएमआरडीएच्या कार्यालयात प्रवेश देण्याची मागणी केली. मात्र, पोलिसांनी सुरुवातीला ती मागणी फेटाळली, त्यामुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं. अखेरीस आंदोलकांच्या आग्रहानंतर खासदार, आमदार आणि स्थानिक प्रतिनिधींना कार्यालयात प्रवेश देण्यात आला.

अमोल कोल्हे काय म्हणाले?

'कुठला नियम लागतो, शांततेत आम्ही मोर्चा इथपर्यंत आणला आहे. आम्हाला कार्यालयातील परिसरात जाऊ द्या, कुठल्या नियमाने आम्हाला आडवता', असं म्हणत अमोल कोल्हे यांनी पोलिसांसमोर आक्रमक भूमिका घेतल्याचं पाहायला मिळालं. 'एकतर आम्हाला आतमध्ये जाऊ द्या, नाहीतर प्रशासनाला खाली बोलवा', अशा तीव्र शब्दात संताप व्यक्त केला. त्यानंतर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएच्या कार्यालयात खासदार, आमदार, मोर्चातील लोकप्रतिनिधी आणि शिष्टमंडळाला सोडण्यात आलं.

यावेळी आंदोलकांनी 'चाकण एमआयडीसी हद्दपार होत आहे, आणि सरकार व प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नाही', अशी तीव्र नाराजी व्यक्त केली. 'गुरुवारी वाहतूक कमी असल्याने आज पाहणी दौरा झाला, परंतु रोजच्या वाहतूक कोंडीवेळी पोलीस आणि प्रशासन कुठे असतात?' असा सवालही आंदोलकांनी उपस्थित केला. सकाळी सहा वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या पाहणी दौऱ्याचाही उल्लेख करून आंदोलकांनी प्रशासनावर कागदी कारवाई केल्याचा आरोप केला. चाकण परिसरातील वाढती वाहतूक समस्या, अपुऱ्या रस्त्यांची स्थिती आणि औद्योगिक विकासाकडे होत असलेले दुर्लक्ष या मुद्द्यांवर नागरिक आणि एम आयडीसी कर्मचारी संतप्त झालेले दिसून आलं.

## 'दैनिक अक्षराज बातमी' चा इम्पॅक्ट !

### राजु मोरे यांच्या दणक्यामुळे विंचूरमध्ये रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०९, विंचूर (नाशिक) :** दै.अक्षराजने वृत्त प्रसिद्ध करताच बांधकाम विभागाची झोप उडाली ! विंचूर शहर आणि परिसरातील रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे बुजविण्याचे काम अखेर सुरू झाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाल्याने नागरिक त्रस्त होते. या पार्श्वभूमीवर विंचूर ग्रामपंचायत सदस्य राजेंद्र मोरे यांनी ग्रामपंचायतीच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभाग व पंचायत समितीकडे दुहेरी निवेदन सादर करून तातडीने दुरुस्तीची मागणी केली होती. अक्षराजने या समस्येवर ठळकपणे वृत्त प्रकाशित केल्यानंतर प्रशासनाने तत्काळ कारवाई करत श्रीराम चौक, विंचूर-निफाड मार्गावर खड्डे बुजविण्याचे काम सुरू केले आहे. रोलर, जेसीबी आणि डांबर बाउजरच्या सहाय्याने रस्त्यांची दुरुस्ती युद्धपातळीवर सुरू आहे.



> विंचूर परिसरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम प्रशासनाने तातडीने सुरू केले आहे. श्रीराम चौक येथे अजूनही धुळीचे साम्राज्य असून तेथे तात्काळ सफाई करण्यात यावी ही विनंती आमच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल सर्व अधिकाऱ्यांचे व दैनिक अक्षराज वृत्तपत्राचे ही मनःपूर्वक आभार.
>
> **- राजेंद्र मोरे, सदस्य, विंचूर ग्रामपंचायत**

कामाची पाहणी करण्यासाठी राजेंद्र मोरे, नानासाहेब जेऊघाले, दिलीप चव्हाण, इम्रान मोमिन, आदी ग्रामपंचायत सदस्य तसेच नागरिक उपस्थित होते.

## भारतातील डिजिटल परिवर्तन संसदीय लोकशाहीसाठी अभिमानास्पद - सभापती प्रा. राम शिंदे

### बार्बाडोस येथील ६८ व्या सी.पी.ए. आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये महत्वपूर्ण विषयांवर चर्चासत्र

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, बार्बाडोस :** भारतातील डिजिटल परिवर्तन ही संसदीय लोकशाहीसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. या संदर्भातील तांत्रिक प्रगतीने लोकशाही व्यवस्था आणखी बळकट आणि गतीमान झाली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतामध्ये या तंत्रज्ञानामुळे शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकता, जबाबदारी आणि सहभाग वृध्दिंगत होत आहे, असे मत महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी मांडले.

बार्बाडोस येथे सुरु असलेल्या ६८ व्या कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोशिएशन (सीपीए) आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये 'लिव्हर्जिंग टेक्नॉलॉजी एनहांसिंग डेमोक्रसी थ्रू डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अॅण्ड टॅकलिंग द डिजिटल डिव्हाईड' या विषयावरील कार्यशाळेत महाराष्ट्र विधान परिषदेचे अध्यक्ष प्रा. राम शिंदे यांनी सहभाग घेत भारतातील डिजिटल परिवर्तनाचा अनुभव आणि लोकशाही व्यवस्था बळकटीकरणात डिजिटल तंत्रज्ञानाचे योगदान याबाबत महत्वपूर्ण मुद्दे मांडले.

सभापती प्रा. राम शिंदे या कार्यशाळेत सहभागी होतांना म्हणाले, लोकशाही म्हणजे अधिकाधिक लोकांच्या सहभागातून अधिकाधिक कल्याणाचा प्रयत्न. भारतासारख्या विश्वातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्रात, तंत्रज्ञानाने शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकता, जबाबदारी आणि सहभाग वाढविला आहे. ई-गव्हर्नन्स, डिजिटल पोर्टल्स व थेट लाभ हस्तांतरणाच्या योजनांमुळे नागरिक थेट शासनाशी जोडले गेले असून, हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'डिजिटल इंडिया' स्वप्नाचा पाया आहे. भारत सरकारच्या डिजीटल धोरणांचा आढावा घेताना त्यांनी "MyGov' पोर्टल, 'आरटीआय ऑनलाइन' प्रणाली, 'डीजीलॉकर', 'उमंग' अॅप व 'डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर' सारख्या यशस्वी उपक्रमांचा उल्लेख केला. या योजनांमुळे ८० कोटी नागरिकांना शासकीय लाभ थेट मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'जॅम त्रिसूत्री'जनधन खाते, आधार



आणि मोबाईल ' यामुळे आर्थिक सम ावेशन साधले गेले असून, 'यूपीआय' प्रणालीमुळे भारत आज जगातील डिजिटल व्यवहारांमध्ये आघाडीवर असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षण, आरोग्य व सामाजिक न्याय क्षेत्रात डिजिटल साधनांचा वापर करून भारताने क्रांतिकारी पाऊल उचलल्याचे सांगत त्यांनी 'स्वयंम', 'दिक्षा', 'आरोग्य सेतू', 'इ-संजीवनी' आणि 'कोविन' या उपक्रमांची माहिती दिली. भारतीय निवडणूक आयोगाने तांत्रिक सुधारणा करीत मतदान यंत्रणा अधिक पारदर्शक बनवून जगात नवा आदर्श निर्माण केला आहे, असे स्पष्ट करुन डिजिटल असमानता, चुकीची माहिती प्रसारण आणि सायबर सुरक्षेच्या आव्हानांबाबत सभापती प्रा. राम शिंदे यांनी सावधगिरीचा इशारा दिला.

भारताची डिजिटल यात्रा ही केवळ तांत्रिक नाही, ती लोकशाही विचारांची नवोन्मेषी मांडणी आहे, प्रत्येक नागरिकाचा सहभाग आणि आवाज या व्यवस्थेत केंद्रस्थानी आहे आणि हेच खऱ्या अर्थाने सर्वसमावेशी आणि सशक्त डिजिटल लोकशाहीला अभिप्रेत असल्याचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी स्पष्ट केले.

## एका रिक्षा चालकाचा दुसऱ्या रिक्षा चालकावर जीवघेणा हल्ला

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, डायघर (ठाणे) :** बुधवार दिनांक ८ रोजी संध्याकाळी साडेचार ते पाच च्या दरम्यान लोढा पलावा ब्रिज खाली एका रिक्षा चालकाने दुसऱ्या रिक्षा चालक (डायघर गावातील रहिवासी) दीपक म्हस्कर याला टायर खोलण्याच्या टॉमिनी डोक्यात हल्ला केल्याची घटना घडली आहे. तसेच दीपक म्हस्करच्या पाठीवर मोठा चावा सुद्धा घेतला आहे. डाव्या डोळ्याला सुद्धा मुक्का मार लागला आहे. मानपाडा पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात



आला आहे. हेमंत ढोळे पोलीस अधिकारी या घटनेचा तपास घेत आहे. दीपक म्हस्करच्या डोक्याला सहा टाके पडले आहेत. जीवदानी हॉस्पिटलमध्ये दीपक म्हसकर सध्या उपचार घेत आहे.

## सिगरेटची ठिणगी पडून डिझेल कॅनचा स्फोट, नाशकात ६ जण होरपळले !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नाशिक :** सातपूर परिसरातील महादेववाडीतील काही झाडांच्या फांद्या छाटताना 'चेन सॉ मशिन' चालविण्यासाठी लागणाऱ्या डिझेलच्या कॅनवर सिगारेटची ठिणगी पडल्याने झालेल्या स्फोटात सहाजण गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली.

जखमींमध्ये एकाच कुटुंबातील दोन महिलांसह दीडवर्षीय बालक व पुरुषांचा समावेश आहे. त्यांना जिल्हा



शासकीय रुग्णालयात दाखल केले असून, सातपूर पोलिस तपास करीत आहेत. महापालिकेच्या मंजुरीनंतर महादेववाडीत कंत्राटदाराकडून झाडांच्या धोकादायक फांद्यांची छाटणी करण्याचे काम बुधवारी दुपारी बारा वाजता सुरू झाले. कामगारांनी झाडाची पाहणी करून 'चेन साँ मशिन'द्वारे कापणी सुरू केली. यावेळी मजुरांमधील एकाने डिझेलची कॅन रस्त्याच्या मध्यभागी ठेवली होती.

यावेळी एक कार तेथून जात असताना कॅनमधील डिझेल सांडले आणि त्याचवेळी कोणीतरी सिगारेट पेटविल्याने एक ठिणगी कॅनसह डिझेलवर पडल्याने मोठा भडका झाला.

त्यावेळी झाडाची तोडणी पाहण्यासाठी थांबलेले पंकज कैलास दोबाडे (वय ३३), दुर्गा आकाश दोबाडे (२२), लता कैलास दोबाडे (४५), कैलास छगन दोबाडे (५७), भावेश आकाश दोबाडे (दीड वर्षे) आणि सोनाली राजेश गाडेकर (३५, सर्व रा. महादेववाडी, खोका म ार्केट, सातपूर) हे गंभीररीत्या भाजले. या घटनेचा सखोल तपास होणार असल्याची माहिती महापालिकेसह पोलिसांनी दिली. तपासातील माहितीनुसार संशयितांवर कारवाई आणि गुन्हा नोंद होणार आहे.

# संपादकीय

## मुंबई महापालिकेसाठी काँग्रेसची तगडी टीम



अखिल भारतीय काँग्रेस समितीने महाराष्ट्र काँग्रेसपाठोपाठ मंगळवारी रात्री मुंबई काँग्रेसच्या जम्बो कार्यकारिणीची घोषणा केली. आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुका लक्षात घेता ही घोषणा महत्त्वाची मानली जाते. यावेळी राजकीय घडामोडी समितीसोबतच मुंबई काँग्रेसचे कोषाध्यक्ष, वरिष्ठ उपाध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव, सचिव आणि इतर महत्त्वाच्या पदांची घोषणा करण्यात आली. राजकीय घडामोडी समितीचे अध्यक्षपद मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या आदेशानुसार, पक्षाचे महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी या समितीच्या नावांची घोषणा प्रसिद्धिपत्रकाच्या माध्यमातून केली. पंधरा जणांचा समावेश असलेल्या राजकीय घडामोडी समितीवर पक्षाच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांच्यासह आमदार ज्योती गायकवाड, खासदार चंद्रकांत हंडोरे, माजी मंत्री अस्लम शेख, आमदार अमीन पटेल, आमदार भाई जगताप, चरणसिंह सप्रा, ज्येष्ठ नेते नसीम खान, सुरेश शेट्टी या नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. मुंबई काँग्रेसच्या कोषाध्यक्षपदाची जबाबदारी पक्षाचे माजी मंत्री आणि मुंबईतील अल्पसंख्यक समाजाचे नेते अस्लम शेख यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. वरिष्ठ उपाध्यक्षपदी आमदार अमीन पटेल, अशोक जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी एकूण ३४ जणांना संधी देण्यात आली असून ज्योती गायकवाड, भूषण पाटील, कालू बुधेलिया, मोहसीन हैदर या पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय सचिवपदासाठी ७८ आणि कार्यकारिणी सदस्यांसाठी २० नावांची नियुक्ती करण्यात आली.

**जिल्ह्याध्यक्षांचीही घोषणा...**

काँग्रेसने मंगळवारी उशिरा जाहीर केलेल्या या यादीत सहा जिल्हाध्यक्षांचीही घोषणा केली आहे. दक्षिण मुंबईची जबाबदारी रवी बावकर, दक्षिण मध्य मुंबई कचरू यादव, उत्तर मध्य अर्शद आझमी, उत्तर मुंबई राजपाल यादव, उत्तर पूर्वसाठी केतन शाह, उत्तर पश्चिमसाठी भावना जैन यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

मुंबई काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांची मुंबई काँग्रेसच्या मुख्य प्रवक्तेपदी नियुक्ती करण्यात आली. त्याशिवाय इतर पाच प्रवक्त्यांची घोषणा यावेळी करण्यात आली. यामध्ये माजी नगरसेवक शीतल म्हात्रे, आनंद शुक्ला, शकील चौधरी, सुरेशचंद्र राजहंस आणि सय्यद हुसैन यांचा समावेश आहे.

## औषधसंहिता

हवे कशाला डॉक्टर
रे सर्दी पडशा करता
दवाखान्यात जायचे
भलता आग्रह धरता

पाळत नाही आपण
कधी औषध संहिता
मनाने घेऊन औषधे
बाधा आणतो हिता

जुन्याप्रिस्किप्शनवर
कशीही औषधे घेता
दोष आजार पणाचा
अवघ्या जगांला देता

डॉक्टरां पेक्षा विद्वान
बरा मेडिसिनविक्रेता
हवेत असे गि-हाईक
आपणांसारखा क्रेता


फी वाचवावी वैद्यांची
त्रास नको तो नसता
असाचं हवा जादुगार
ऋग्णांस ना तपासता

एक्सपायरी डेट काय
कशास उगाचं पाहता
नंतर सोसत बसायचे
रे रिॲक्शनची दाहता

चिंता वाढवी सर्वांची
वैद्यकीय खर्च वाढता
निर्माण होतात बवाल
विचित्र कुठेही घडता

**– हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त



अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले. त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज पुण्यतिथी. गुरुदत्तजींच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख.

गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो.

९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते .

गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्ल्या. त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली.

अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय


**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा, पुणे**

# माणसातील हरवलेली मानवता जागृत करणारं 'जागरण'

अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपल्या साहित्याचा तेजस्वी व आकर्षक आलेख गगनाला भिडवणारे आणि तळागाळातील दीनदलित, शोषित, पिडित, वंचित, उपेक्षितांना आपल्या निर्भिड लेखणीच्या माध्यमातून जागृत करणारे व त्यांना निडरपणे व बेडरपणे जगायला शिकवणारे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध लेखक, कवी, साहित्यिक तथा वात्रटीकाकार आणि हजारो युवकांचे आयडॉल व माझे मार्गदर्शक भारत सातपुते सर यांनी लिहिलेले जागरण नावाचे दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण पुस्तक नुकतेच वाचनात आले. हे जागरण नावाचे पुस्तक वाचताना सातपुते सरांनी आपल्या बालपणापासून ते आतापर्यंतच्या सर्व आठवणी, जीवनात आलेले चांगले वाईट प्रसंग, त्यांना गरिबीचे व जातीयतेचे सोसावे लागलेले विखारी चटके आणि शिक्षकी पेशा सांभाळत असताना शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांची निष्क्रियता, कामचुकारपणा, आळशीपणा, चालढकलपणा तसेच तालुक्याचे व गावाचे राजकारण शाळेत आणणे आणि शिकवताना टंगळमंगळपणा करणे आणि सरांना इथल्या व्यवस्थेमुळे सोसावे लागणारे असूडाचे जबरदस्त फटके हे त्यांनी जागरण या त्यांच्या आत्मचरित्रात अगदी पोटतिडकीने आपल्यासमोर ठेवले आहे. सातपुते

सर हे अतिशय गरीब परिस्थितीतून तावूनसुलाखून निघालेले एक जबरदस्त व्यक्तिमत्व आहे. त्यांना जीवनात गरिबीला व दारिद्र्याला कसे हिंमतीने तोंड द्यावे लागले आणि शिक्षणासाठी कसा आर्थिक संकटाचा सामना करावा लागला, हे त्यांनी जागरण या पुस्तकात अगदी सविस्तरपणे मांडले आहे. सरांना शालेय जीवनापासूनच लेखनाची खूप आवड होती. कविता लिहिणे, निबंध लिहिणे, वर्तमानपत्रात वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिणे हे सातपुते सरांचा शालेय जीवनापासूनच आवडता छंद होता. त्यांना पुस्तक प्रकाशित करताना बऱ्याच वेळा सावकाराचे कर्ज काढावे लागले आहे. त्यांनी जवळपास पाच डझन पुस्तके आजवर प्रकाशित केले आहेत. आणि त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची दखल घेऊन त्यांना विविध सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय यंत्रणा यांनी विविध पुरस्कार देऊन त्यांचा यथोचित गौरव



**जागरण – भारत सातपुते**
**मांजरा प्रकाशन, लातूर**
**किंमत –२५०/–**
**(८०८७६९५०००)**

केला आहे. आतापर्यंत त्यांना शंभर पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. एवढे पुरस्कार मिळवणारा कवी व साहित्यिक माझ्या मते तर हल्ली सातपुते सर हे महाराष्ट्रातील एकमेव व्यक्तिमत्व असेल. त्यांच्या बऱ्याच कविता व लेख पुस्तकात अभ्यासक्रमासाठी समाविष्ट करण्यात आले आहेत. ते निरंतर व

अहोरात्र लिहीत असतात. महाराष्ट्रात जेवढे कवी आहेत तेवढ्या कवींना लाजवणाऱ्या व आत्मपरीक्षण करायला लावणाऱ्या कविता या सातपुते सरांनी आपल्या काव्यसंग्रहात लिहिलेल्या आहेत. जीवनाची वाटचाल करत असताना त्यांच्या वाटेवर अनेक बोचरी काटे आली, अनेक खाचखळगे आली, दुःखाचे डोंगर आडवे आले, जातीमुळे त्यांना अपमानास्पद व हीन दर्जाची वागणूक मिळाली, असा त्यांना जीवनाच्या विविध टप्प्यावर संघर्ष करावा लागला. त्यांच्या घरची परिस्थिती अतिशय हलाखीची व गरीब होती. सातपुते सरांना बंबई मिठाई खाण्यासाठी आईकडे रडगाणे लावल्यावर आई तुराट्यात खवून ठेवलेले केस गोळा करून त्याची बंबईमिठाई सरांना घेऊन द्यायची. त्यांना शालेय साहित्य व पुस्तके विकत घ्यायला पैसे नसायचे. तेव्हा त्यांना खूप खूप दुःख व्हायचे आणि त्यांचे डोळे ओले व्हायचे. पण ते खचून कधीच गेले नाहीत. उलट जिद्दीने पेटून उठून आपले काम करतच राहिले आणि उच्च शिक्षण शिकून शिक्षकाची नोकरी काबीज केली. त्याकाळी दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला लेखणीच्या माध्यमातून वाचा फोडण्याचे महान काम त्यांनी केले. प्रशासनाला व येथील गुलामगिरीत खितपत पडलेल्या सामान्य माणसांना लेखणीच्या माध्यमातून जागृत करण्याचे काम केले. शिक्षकी पेशा सांभाळत असताना त्यांनी चांगल्या वाईट शिक्षकांचे बारकाईने निरीक्षण करून वाईट शिक्षकांना लेखणीच्या माध्यमातून चांगलाच धडा शिकवला. आणि कर्तृत्ववान शिक्षकांचा लेखणीच्या माध्यमातून त्यांनी नेहमी सन्मान केला आहे. म्हणजे त्यांनी शिक्षकांना सुद्धा जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. जागरण हे असे आत्मचरित्र आहे की, ते मेलेल्या माणसाला,जसे की ज्यांना अस्तित्वाची जाणीव नाही अशा माणसांना जागृत करण्याचं काम या जागरण पुस्तकाच्या माध्यमातून नक्कीच होणार आहे. म्हणून जागरण पुस्तक वाचणे ही काळाची गरज आहे. जागरण पुस्तक गुलामाला गुलामीची जाणीव करून देते. माणसाला माणूस असल्याची जाणीव करून देते. कर्तव्यात कामचुकारपणा करणाऱ्या शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना जागृत करून कर्तव्यपरायणता शिकवते. हल्ली समाज झोपेत आहे. तो स्वतःच्या अस्तित्वाला विसरून गेला आहे, आणि माणसासारखे जीवन न जगता हैवानासारखे जीवन जगत आहे. माणुसकीला पायदळी तुडवून सख्ख्या भावासोबत मनामध्ये कपट धरून राहत आहे. गुंठाभर जमिनीसाठी व इंचभर जागेसाठी सख्ख्या भावाचा काटा काढत आहेत. म्हणजे त्याच्यातील राक्षसपणा नष्ट होऊन माणूसपण जागृत होणे काळाची गरज आहे. आणि आपल्याला जर आपल्यातला माणूस व मानवता जागी करायची असेल तर आपण जागरण हे पुस्तक वाचलेच पाहिजे. जागरण हे पुस्तक एकदा हातात घेतले तर ते शेवट होईपर्यंत खाली ठेवूच वाटत नाही, इतके प्रभावी, आकर्षक व दर्जेदार पुस्तक आपल्याला भारत सातपुते सरांनी लिहून दिले आहे. प्रत्येकाने वाचावे अशा साध्या, सोप्या व सरळ भाषेत त्यांनी लिखाण केले आहे. हे पुस्तक कोणीही वाचले तरी समजते. माणसातील मानवता जागृत करून माणसाचे अस्तित्व प्राप्त करून देणाऱ्या सातपुते सरांना खरोखरच सलाम करावा वाटतो. त्यांचा जीवन संघर्ष व त्यांची समाजाप्रती असणारी अस्मिता सरांनी अतिशय मार्मिकपणे लिहून समाजाप्रती असणारी निष्ठा दाखवली आहे. फक्त वर्तमानपत्रात लिहिणे सोपे आहे. परंतु पुस्तके लिहिणे खरोखरच खूप कठीण काम आहे. जेवढे लेखक वर्तमानपत्रात लेख लिहितात त्यांचे कुठे एक दोन पुस्तके प्रकाशित झाले आहेत. परंतु सर काव्य संमेलन व शिक्षकी पेशा सांभाळत लेखन कार्य करतात, ही काय साधी गोष्ट नाही माय!

त्यांचा सतत होत असणारा सन्मान हाच त्यांच्या कार्याची खरी देणगी आहे. अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेले भारत सातपुते सर आज संबंध महाराष्ट्राच्या ओठावर आहेत. त्यांनी आपली एक आगळी वेगळी छाप लोकांवर पाडून समाजात एक जबरदस्त प्रतिमा तयार केली आहे. त्यांचा संबंध खूप मोठ्या लोकांसोबत आहे...तरीपण ते अगदी साधे राहतात...माझ्यासारख्या होतकरू व नवख्या लेखकाला वेळात वेळ काढून फोन लावतात आणि लिहिण्यासाठी आणखीन प्रोत्साहित करतात. शून्यातून विश्व निर्माण करणारे भारत सातपुते सर खरोखरच इतर कवींसाठी, लेखकांसाठी आणि शिक्षकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचा जीवन संघर्ष भल्याभल्यांना थक्क करणारा आहे. त्यांच्या जागरण या पुस्तकाला अनेक पुरस्कार मिळाले आहेत. हे आत्मचरित्र खरोखरच खूप वाचनीय व चिंतनीय आहे, ते वाचताना माणूस स्वतःला एका वेगळ्या विश्वात घेऊन जातो. सरांच्या पुस्तकाचे परीक्षण करण्याएवढा मी मोठा लेखक नाही हो...सरांच्या पुस्तकांची समीक्षा खूप मोठ मोठ्या लेखकांनी नामांकित वर्तमानपत्रांमध्ये केली आहे. सरांचा मित्रपरिवार खूप मोठा व दांडगा आहे. त्यांच्या कविता कोणालाही खूप आवडतात आणि मनाला भावतात, तेव्हा कोणताही माणूस मंत्रमुग्ध होऊन जातो. सरांची शैली एकदम जबरदस्त व व्याकरण दृष्ट्या खूप छान आहे. असं हे माणसातील मानवता जागृत करणारं जागरण प्रत्येकाने वाचावे, हीच नम्र विनंती!

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# दिबांचे नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे...?

मोठ्या दिमाखात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे बुधवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केले. दृष्ट लागावा असा हा उद्घाटन सोहळा झाला. या विमानतळामुळे नवी मुंबईचे महत्त्व प्रचंड वाढले आहे, शिवाय मुंबईच्या विमानतळाला पर्याय उभा राहिल्याने मुंबईवरील ताणदेखील कमी पडणार आहे. त्यामुळे या विमानतळाचे सर्वांनीच स्वागत केले आहे. जवळपास तीन दशकांपासून या विमानतळाची चर्चा होती. सुरुवातीला याचा पनवेल विमानतळ असा उल्लेख केला जात असे. त्यानंतर नवी मुंबई विमानतळ असा उल्लेख झाला. मात्र, या विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची स्थानिकांची मागणी आहे. पाच वर्षांपासून त्यासाठी नवी मुंबई, उरण, पनवेल तसेच ठाणे, पालघरमधील आगरी-कोळी आणि ओबीसी समाज संघर्ष करत आहे. त्यामुळे विमानतळ उद्घाटन सोहळ्यात विमानतळाला दिबांचे नाव केव्हा देणार, याची सर्वांना उत्सुकता लागली होती. मात्र, दुर्दैवाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दोन्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार तसेच हवाई नागरी उड्डाणमंत्री राम मोहन नायडू आणि राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ या सर्वांना लोकनेते दि. बा. पाटील यांचा विसर पडल्याचे दिसून आले. ज्या नेत्याचे नाव देण्याची मागणी पाच वर्षे होत आहे, ज्यासाठी आंदोलन होत आहे, सरकार सकारात्मक आहे असे दाखवते तरीही त्यांचा उल्लेखदेखील महाराष्ट्रातील नेत्यांनी केला नाही, हे नक्कीच भूषणावह नाही.

दि.बा.पाटील यांच्यामुळे महाराष्ट्रात साडेबारा टक्के धोरण मंजूर झाले. शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मोबदल्यात त्यांना साडेबारा टक्के भूखंड देण्यासाठी दि. बा. पाटील यांनी लढा उभारला होता. सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईची पायाभरणी होत असताना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिबांनी दिलेला लढा ऐतिहासिक आणि निर्णायक होता. त्याकाळी सिडकोने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यानंतर योग्य मोबदला दिला नव्हता. याविरोधात ठाणे जिल्हा, पनवेल आणि उरण तालुक्यातील स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या संतापाला दिबांनी योग्य दिशा देऊन लढा उभारला होता. या लढ्यात पाच शेतकऱ्यांना हौतात्म्य पत्करावे लागले होते. अत्यंत अभ्यासू, स्पष्ट वक्ते आणि मुख्य म्हणजे भ्रष्टाचारापासून दूर अशी दि. बा. पाटील यांची प्रतिमा होती. त्यांनी आयुष्यभर प्रकल्पग्रस्त, शेतकरी, कष्टकरी आगरी आणि कोळी समाजाच्या तसेच ओबीसींच्या हक्कांसाठी आयुष्य वेचले. त्यामुळेच नवी मुंबई आकारास येत असताना स्थानिकांना त्यांचे हक्क मिळवून देण्यात, त्यांना ताठ मानेने जगवण्यात दिबांची भूमिका महत्त्वाची राहिली आहे. दि. बा. पाटील आमदार, खासदार होते. मात्र, त्यांनी कधीही स्वहित पाहिले नाही. साधी राहणी आणि उच्च विचाराचे ते नेते होते. म्हणूनच त्यांना लोकनेते म्हटले जाते. अशा या लढवय्या नेत्याचे नाव नवी मुंबई विमानतळाला द्यावे, अशी मागणी अनेक वर्षे होत आहे. विशेष म्हणजे महाविकास आघाडीचे सरकार जाता जाता त्यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या नावाला मंजुरी दिली तर त्यानंतर जून २०२२ मध्ये आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारनेही दिबांच्या नावाला मंजुरी देत केंद्राकडे प्रस्ताव पाठवला होता. म्हणजे केंद्र सरकारकडे सव्वा तीन वर्षांपासून दिबांच्या नावाचा प्रस्ताव आहे. तरीही त्यांनी सरकार सकारात्मक आहे, एवढेच उत्तर दिले आहे. विशेष म्हणजे ३ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघर्ष कृती समितीला तीन महिन्यांत दिबांचे नाव देण्याची ग्वाही दिली. काही तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्र्यांनी संघर्ष समितीला सांगितले आणि त्यावर सर्वांनी विश्वास ठेवला. मात्र, विमानतळाचे उद्घाटन होताना कुणीही दि. बा. पाटील यांचा उल्लेखही केला नाही. या संपूर्ण कार्यक्रमात उल्लेखनीय बाब म्हणजे एकट्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांचा आदराने उल्लेख केला. महाराष्ट्र पुत्र लोकनेते दि. बा. पाटील यांची आठवण काढत त्यांनी समाज आणि शेतकऱ्यांसाठी सेवाभावाने काम केल्याचे कौतुक केले. मात्र, त्यांनीही विमानतळाला दिबांचे नाव देण्याबाबत काहीही उल्लेख केला नाही. एकूणच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटनाच्या कार्यक्रमात दिबांचा विसर पडल्याने स्थानिकांचा संताप आता अनावर झाला आहे. सरकारने किमान दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला केव्हा दिले जाईल, हे सांगायला हवे होते. मात्र, ज्या भूमीत आले त्याच भूमीच्या नायकाचा सर्वांना विसर पडला. यामुळे स्थानिक दुखावले गेले आहेत. कार्यक्रमानंतर याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. राज्य आणि केंद्र सरकार लोकभावनेशी खेळत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. याकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. दिबांचे नाव विमानतळाला देण्यासाठी पाच वर्षे संघर्ष सुरू आहे. प्रत्यक्षात सव्वा तीन वर्षांपासून सकारात्मक आहोत, असे सरकार सांगते. मग नाव देण्यात दिरंगाई का, , याचे उत्तर दिले जात नाही आणि उद्घाटनाची तारीख जवळ आल्यानंतर तांत्रिक कारणामुळे तीन महिने लागतील, असे मुख्यमंत्री संघर्ष समितीला सांगत असतील तर यातून काय मेसेज लोकांपर्यंत जातो, याचा सरकारने विचार करण्याची गरज आहे. इतका भव्यदिव्य उद्घाटन समारंभ होऊनही नवी मुंबई विमानतळाला दि.बां.पाटलाचं नाव देण्यात गाडे कुठे अडते आहे....?




This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

## सेवाभावी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन पूरग्रस्त भागात मदतीचा हात द्यावा - मंत्री तटकरे



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, ठाणे :** मराठवाड्यासह राज्यातील काही भागांमध्ये पूरस्थितीत महिलांच्या आरोग्याच्या गरजांचा विचार करून त्यांच्यासाठी वैयक्तिक स्तरावर ५ लाख सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले आहे. तसेच सक्षम फाउंडेशनतर्फे आणखी १० हजार सॅनिटरी पॅड पूरबाधित महिलांना देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. पुरामुळे अनेक कुटुंबांचे जगणे विस्कळीत झाले आहे. शासनामार्फत अन्न, वस्त्र व आर्थिक साहाय्य दिले जात असले तरी महिलांच्या आरोग्याशी निगडित सॅनिटरी नॅपकीनसारख्या मूलभूत गरजाही पूर्ण करण्यात येत आहेत. राज्यातील पूरग्रस्तभागातील ८ ते ९ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नियोजनाच्या राखीव निधीतून सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## शिवशंभो मित्र मंडळातर्फे कोजागिरी पौर्णिमा साजरी नगरसेविका तनुजा मढवींचा पुढाकार...



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०९, जुईनगर (नवी मुंबई) :** नगरसेविका तनुजा मढवी यांनी पुढाकार घेत शिवशंभो मित्र मंडळातर्फे कोजागिरी पौर्णिमा मोठ्या उत्साहात साईबाबा मंदिर सेक्टर २३, जुईनगर येथे साजरी करण्यात आली. तसेच कोजागिरी पौर्णिमेचे महत्व म्हणजे ही रात्र 'उजागृत कोण आहे' अशी विचारणा करणारी रात्र आहे, कारण या दिवशी देवी लक्ष्मी पृथ्वीवर फिरते आणि जागरण करून भक्ती करणाऱ्यांना धन व समृद्धीचे वरदान देते. या दिवशी चंद्र १६ कलांनी परिपूर्ण असतो आणि त्याचे किरण अमृतसमान असतात, ज्यामुळे चंद्रप्रकाशात दूध आटवून पिणे आरोग्यासाठी लाभदायक मानले जाते. असे तनुजा मढवी यांनी कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व सांगितले. त्यानुसार प्रत्येक वर्षी प्रमाणे महिलांचे नृत्य संगीताचे कार्यक्रम झाले व रात्री बारा वाजल्यानंतर दुधामध्ये चंद्र पाहून सर्वांनी मसाला दुधाचा आस्वाद घेतला. त्यानंतर मंडळाच्या वतीने जमलेल्या नागरिकांना भोजनदान दिले. त्यासाठी सभासद व इतर उत्सुक मुले- मुली यांनी जेवण बनविण्यास मदत केली व अशाप्रकारे कोजागिरी पौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या आनंदात साजरा केला. त्यावेळी जमलेल्या काही जणांचा सदर फोटो आहे.


## बहुजन समाज पार्टी नवी मुंबई अध्यक्ष यांनी उद्यान विभागातील कर्मचाऱ्यांचे स्वीकारले निवेदन



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०९, बेलापूर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका मधील निवृत्त उद्यान कर्मचारी यांच्या वारसांना महापालिकेत कॉन्ट्रॅक्टमध्ये नोकऱ्या मिळाल्या पण त्यांना फक्त १२ हजार वेतन मिळते. किमान वेतन पद्धतीनुसार त्यांना पगार मिळत नाही. महानगरपालिकेतून मिळणारा पगार अधिकारी व ठेकेदार संगनमताने खातात व प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना १२ हजार रुपये पगार देतात त्यामुळे किमान वेतन नियमानुसार आमच्या वारसांना मिळावं. अशी मागणी घेऊन अनेक निवृत्त कर्मचारी नवी मुंबई महानगरपालिकेच्या समोर बेमुदत साखळी उपोषणाला बसले होते. त्यांना भेट देण्यासाठी प्रा.दत्ता हेगडे उपस्थित होते. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या भावना समजावून घेतल्या व बहुजन समाज पार्टीचा आपल्या आंदोलनाला पाठिंबा असल्याचे जाहीर केले. व अधिकाऱ्यांशी बोलून आपणास न्याय देऊ असेही त्यानी सांगितले. आंदोलक आठ दिवस झाले महापालिका गेट समोर बसले, तरीही त्यांची दखल अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही. याबद्दल दत्ता हेगडे यांनी संताप व्यक्त केला. हा पेशवाई पद्धतीचा कारभार चालू दिला जाणार नाही असा कडक शब्दात इशारा त्यांनी दिला.

## कनकिया रोड मिरारोड येथे स्व. गिलबर्ट मेंडोसा ट्रॅफिक पार्क लोकार्पण सोहळा संपन्न



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०९, मिरा भाईंदर :** दिनांक ०९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वा. मिरा भाईंदर शहराचे प्रथम आमदार स्व. गिलबर्ट मेंडोसा ह्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ओवला माजिवडा चे आमदार व परिवहन मंत्री ह्यांच्या प्रयत्नाने छोट्या मुलांकरिता परिवहन नियमाची शिकवण मिळावी. म्हणून स्व. गिलबर्ट मेडोसा ट्रॅफिक पार्क चे उदघाट्न शेठच्या मुलीच्या हस्ते कॅथलीन पेरेरा (माजी महापौर) व आमदार प्रताप सरनाईक करण्यात आले. शिवसेनेचे कार्यकर्ते हजर होते.

कार्यक्रम व्यवस्था निशा नार्वेकर (महिला शहर प्रमुख) सचिन मांजरेकर, (शहर प्रमुख) माजी उपमहापौर प्रवीण पाटील, माजी नगरसेवक धनेश पाटील, दिनेश नलावडे सतिश अंचेकर (विभाग क्र. १२ प्रमुख) माजी नगरसेविका तारा घरत आदी अनेक गिलबर्ट शेठना मानणारा वर्ग व कार्यकर्ते मोठया प्रमाणात उपस्थित होते. पार्क फार छान आहे.

आमदार सरनाईक ह्यांच्या कल्पने ने साकार झाले व त्याचे लोकार्पण झाले व ट्रॅफिक नियमांची माहिती देणारे आहे. मुलं खेळता खेळता ट्रॅफिक चे नियमाची ओळख होईल. अशी पार्क ची कल्पना आहे.

## खा.धानोरकर यांचा चंद्रपूर मनपाला 'अल्टिमेटम'; 'जीवघेणे' रस्ते दुरुस्ती न झाल्यास 'गिट्टी फेक' आंदोलन



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** शहरातील रस्त्यांच्या दयनीय आणि जीवघेण्या अवस्थेवरुन चंद्रपूर शहर महानगरपालिका (मनपा) प्रशासनाला तीव्र शब्दात इशारा दिला आहे. शहरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी खा. प्रतिभा धानोरकर यांनी मनपा आयुक्तांना थेट ५ (पाच) दिवसांचे 'अल्टिमेटम' दिले असून या निर्धारित वेळेत काम न झाल्यास, मनपाच्या निष्क्रियतेविरोधात महानगरपालिकेच्या प्रांगणातच 'गिट्टी फेक' आंदोलन सुरु करण्याचा इशारा दिला आहे.

खा. प्रतिभा धानोरकर यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रामध्ये रस्त्यांच्या दुरावस्थेवर प्रकाश टाकला आहे. चंद्रपूर शहरातील मुख्य रस्त्यांपासून अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे.

जागोजागी पडलेले मोठमोठे खड्डे, उखडलेला डांबर आणि निकृष्ट दर्जाचे काम यामुळे सामान्य नाहरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यांवरुन ये-जा करणे आता नागरिकांसाठी मोठी अडचण आणि 'जीवघेणी बाब' बनली आहे. विद्यार्थ्यांपासून ते वयोवृध्दांपर्यंत सर्वांनाच याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, रस्त्यावर अपघात झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी तात्काळ रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.खासदार प्रतिभा धानोरकर यांनी मनपा आयुक्तांना स्पष्टपणे कळविले आहे की, चंद्रपूर शहरातील रस्त्यांची दुरुस्ती ५ दिवसांच्या आत पूर्ण न झाल्यास, चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या निष्क्रियतेचा तीव्र निषेध करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रांगणात ' गिट्टी फेक' आंदोलन सुरु करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## शेतकरी पॅकेजमुळे बळीराजा पुन्हा उभा राहील आदिवासी विकास मंत्री डॉ.उईके यांनी व्यक्त केला विश्वास



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** राज्यात विविध ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या मागे खंबीरपणे उभे आहे. नुकसानग्रस्त भागात ६५ मिलीमीटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. त्यामुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांच्या मदतीचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेजमुळे नुकसानग्रस्त भागातील बळीराजा पुन्हा उभा राहील, असा विश्वास राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांसाठी आत्तापर्यंतची ही सर्वात मोठी आर्थिक मदत आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ.उईके म्हणाले, राज्य शासनाने जाहीर केलेली मदत दिवाळीपूर्वी देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. अतिवृष्टीमुळे शेती आणि शेतकऱ्यांसह पिके, जनावरे, गोठे, दुकाने, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. काही जणांचे मृत्युही झाले आहेत.

पुरामुळे कागदपत्रे, शैक्षणिक साहित्य वाहून गेलेल्या एकाही विद्यार्थ्यांचे शिक्षण बाधित होणार नाही, याची दक्षता घेतली जाणार आहे, असेही पालकमंत्री डॉ. उईके यांनी सांगितले.शेतकऱ्यांना

**आत्तापर्यंतची सर्वाधिक मदत**

राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे २९ जिल्हे प्रभावित झाले आहेत. नुकसानग्रस्त २५३ तालुके आणि २०५९ मंडळांमध्ये मदतीसाठी ६५ मिलीमीटर पावसाची अट न ठेवता शेतकऱ्यांना सरसकट नकसानभरपाई देण्यात येणार असून राज्य शासनाने ३१ हजार ६२८ कोटींच्या मदतीचे पॅकेज जाहीर केले. या पॅकेजनुसार केरडवाहू शेतीसाठी प्रती हेक्टरी १८ हजार ५०० रुपये, हंगामी बागायतीसाठी २७ हजार तर बागायतीसाठी प्रति हेक्टरी ३२ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. ही आत्तापर्यंतची सर्वाधिक मदत आहे.

**ग्रामपंचायत दिडोरी (तास) ता. निफाड जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण )**

ग्रामपंचायत दिडोरी (तास) ता. निफाड जि नाशिक येथे होणाऱ्या वार्षिक कामासाठी साहित्याची ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा शासनाच्या **www.mahatender.gov.in** प्रसारित करण्यात येत आहे.निविदा भरण्याची दिनांक १०/ १०/ २०२५ सकाळी १० .०० वा. पासून. प्रसारित करण्यात आली आहे. अधिक माहिती साठी वरील वेबसाईट वर उपलब्ध असून कंत्राटदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत तास दिडोरी ता. निफाड जि नाशिक यांच्या कडे राखून ठेवण्यात आले आहे.

सही – प्रशासक / ग्रामसेवक

ग्रामपंचायत दिडोरी (तास) ता. निफाड जि नाशिक

## राज्यातील सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित नेटवर्क, संचलन व मॉनिटरिंग करण्याचा प्रस्ताव



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, मुंबई :** राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच एमएसआरडीसी, एनएचएआय, अशा अनेक संस्थाच्या वतीने रुग्णवाहिका सेवा देण्यात येतात. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित नेटवर्क व संचलन, मॉनिटरिंग करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मंत्री आबिटकर बोलत होते. या बैठकीला सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे - बोर्डीकर, आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, परिवहन आयुक्त, तसेच आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा पुरवठादार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्याच्या रुग्णसेवेत लवकरच नवीन अत्याधुनिक १०८ ॲम्बुलन्स रुजू होणार आहेत. या सर्व रुग्णवाहिका निर्धारित केलेल्या वेळेत सेवेत रुजू करून आवश्यकतेनुसार ठिकाणे निश्चित करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

नवीन अत्याधुनिक १०८ रुग्णवाहिकेसोबतच १०२, १०४, ११२ या क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही कार्यरत आहेत. एमएसआरडीसी, एनएचएआय या संस्थांच्या वतीने महामार्गावर, टोल नाक्यावर, रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत. या सर्व रुग्णवाहिकांचे एकत्रित नेटवर्क तयार केल्यास, रुग्णांना गोल्डन अवर मध्ये जलद रुग्णसेवा उपलब्ध होईल, असे मंत्री आबिटकर यांनी सांगितले. राज्यातील रुग्णवाहिका सेवावर महाराष्ट्र शासनअसे स्पष्ट लिहिले असावे. कोणत्याही कंपनीचे नाव किंवा चिन्हे वापरू नये. पुरवठादार संस्थेने, रुग्णवाहिकेवर आपल्या कंपनीची नव्हे तर महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असल्याचे ब्रॅण्डिंग करावे. शासकीय अधिकाऱ्यांच्या मान्यता घेऊनच रुग्णवाहिकेवरील ब्रँडिंग करावे, अशा स्पष्ट सूचना मंत्री आबिटकर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## गर्लफ्रेंडचे चोचले पुरवण्यासाठी २० वर्षीय देवेशने केलं मोठं कांड



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नागपूर :** शिक्षण घेत असतानाच हॉटेल मॅनेजमेंटचा एक विद्यार्थी दुचाकी चोरीच्या मार्गावर गेला आणि अवघ्या काही महिन्यात ११ दुचाकींची चोरी करून पोलिसांच्या रडारवर आला. जुगार खेळण्याचं व्यसन आणि गर्लफ्रेंडचा खर्च भागवण्यासाठी चोरीच्या वाटेवर गेलेल्या या तरुणाला अखेर कळमना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपी देवेश देवेंद्र सनोडिया (वय २०, रा. सुंदरनगर, पारडी) असं अटकेत असलेल्या तरुणाचं नाव आहे.

मार्च २०२५ पासून ऑक्टोबरपर्यंत कळमना परिसरातील कडकनाथ मार्केटमध्ये दुचाकी चोरीच्या घटना वाढल्या होत्या. व्यापारी, कामगार आणि ग्राहकांची वाहने बाजारपेठेतून वारंवार गायब होऊ लागल्याने नागरिक त्रस्त झाले होते. सततच्या तक्रारींनंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी त्या ठिकाणचा सखोल अभ्यास केला. चोरी घडणाऱ्या ठिकाणांचा आलेख तयार करून त्या परिसरात पोलिसांनी स्वतःच्या खर्चाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले. अखेर याच फुटेजच्या आधारे आरोपीपर्यंत पोलीस पोहोचले.

५ ऑक्टोबर रोजी पोलिसांनी आरोपी देवेशला ताब्यात घेतलं असता त्याच्याकडे एक चोरीची दुचाकी सापडली. चौकशीत त्याने आणखी १० गाड्या चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपीकडून एकूण ११ दुचाकी आणि एक आयफोन असा सुमारे ३ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस तपासात उघड झालं की, देवेश हा मार्केट परिसरात नियमित ये-जा करत असे. त्याच्या वडिलांचे कळमना मार्केटमध्ये भाजीपाला विक्रीचं दुकान असल्याने तो सहज त्या परिसरात फिरत असे, लोक खरेदीत व्यस्त असताना तो त्याचा गाडीची चावी ज्या गाडीला लागू शकते ती गाडी तो चोरून न्यायचा. चोरीनंतर खोट्या कागदपत्रांच्या आधारे जडदसारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर ती वाहनं विकत असे.

याद्वारे अनेक निष्पाप लोकांनी त्याच्याकडून या गाड्या विकत घेतल्या असल्याचं पोलिसांना समजलं आहे.

देवेश हॉटेल मॅनेजमेंटचं शिक्षण घेत होता. मात्र, त्याला जुगार खेळण्याचं व्यसन होतं. त्यातून झालेला तोटा आणि गर्लफ्रेंडवर होणारा खर्च भागवण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग स्वीकारला. पोलिसांच्या चौकशीत असंही समोर आलं की तो दर गुरुवारी आणि शनिवारी सकाळच्या वेळात, जेव्हा मार्केटमध्ये सर्वाधिक गर्दी असते, त्यावेळी होंडा पॅशन आणि होंडा स्प्लेंडर या लोकप्रिय मॉडेलच्या गाड्यांवर लक्ष ठेवत असे. कळमना पोलिसांनी गेल्या पाच महिन्यांपासून आरोपीवर गुप्त पाळत ठेवली होती. शेवटी त्याच्या हालचालींचा तपशीलवार अभ्यास करून सापळा रचला आणि त्याला जेरबंद करण्यात यश आलं. पोलिस पुढील तपास करत असून देवेशकडून आणखी काही चोरीच्या घटनांचा तपशील समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मुदखेड नगरपरिषदेचे प्रभाग निहाय आरक्षण सोडत जाहीर



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड नगरपरिषदेच्या थेट जनतेतून नगराध्यक्ष सोडतीनंतर आता १० प्रभागातील २० नगरसेवकांची आरक्षण सोडण्यात आली असून इच्छुकांमध्ये थोडी खुशी थोडा गम यांसह अनेकांचा हिरमोड झाला आहे. मुदखेड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुक २०२५ नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी सोडण्यात आले आहे. नगर परिषद अंतर्गत एकूण दहा प्रभाग असून नगरसेवकाची संख्या २० आहे. नगर परिषदेच्या नगरसेवक आरक्षण सोडत दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता सोडण्यात आली. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रविण मेंगशेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषदेची प्रभाग निहाय आरक्षण सोडत प्रक्रिया

नायाब तहसीलदार विजय पाटे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी जगदीश दळवी यांच्या प्रमूख उपस्थितीत पार पडली आहे.

प्रभाग क्रं १ (अ) अनुसुचित जमाती (महिला) आणि (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्रं २ (अ) अनुसुचित जाती (पुरुष) आणि (ब) सर्वसाधारण (महिला) प्रभाग क्रं ३ (अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) आणि (ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रं ४ (अ) अनुसुचित जाती (महिला) आणि (ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रं ५ (अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला)आणि (ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रं ६ (अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) आणि (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्रं ७ (अ) अनुसूचित जाती (महिला) आणि (ब) सर्वसाधारण,प्रभाग क्रं ८ (अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (पुरुष) आणि (ब) सर्वसाधारण (महिला) प्रभाग क्रं ९ (अ) सर्वसाधारण (महिला) आणि (ब) सर्वसाधारण, प्रभाग क्रं १० (अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग (पुरुष) आणि (ब) सर्वसाधारण (महिला) या प्रमाणे प्रभाग निहाय आरक्षण सुटले आहे.

या सोडतीसाठी कार्यालयीन अधिक्षक गुंडे, महाजन, दिलीप पवार, रमेश सावंत, गणेश वड्डे, सचिन चूंचे, मोहन पांचाळ, शैलजा फुलारी, माधव जमदाडे, शशिकांत पौळ, मोहन कवळे,आदींनी परिश्रम घेतले आहे तर आरक्षण सोडतीसाठी शहरातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील चिमूकले संविधान, राजेश, अनुरुद्ध आणि अमन यांनी चिठ्ठीच्या साह्याने आरक्षण सोडत काढण्यात आली.

## मेव्हणीसोबत लग्नाचा हट्ट! तीन मुलाच्या बापाने बायकोसमोरच मेहुणा आणि मेव्हणीला संपवलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, गुजरात :** महाराष्ट्राचा शेजारी असलेल्या गुजरातमधून सध्या एक धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना सुरत शहरामध्ये घडली आहे. या घटनेत एका विवाहित व्यक्तीने स्वतःच्या पत्नीसमोरच मेहुणा व मेव्हणीची हत्या केली आहे.

**नेमकी घटना काय घडली?**

गुजरातमधल्या सुरतमध्ये दुहेरी हत्याकांड घडलं आहे. या हत्याकांडातल्या गोष्टींनी सध्या सर्वत्र खळबळ उडाली आहे. उधना पोलिस स्टेशन परिसरात रात्री

उशिरा एका व्यक्तीने नातेसंबंध विसरुन जात मेहुणा, मेहुणी आणि सासूवर निर्घृण हल्ला केला आहे. या हल्ल्यामध्ये मेहुणा व मेहुणी जागेवरच मृत पावले तर सासू जखमी झाली आहे आणि तिला रुग्णालयात दाखल केले गेले आहे. मृत भाऊ-बहिण चार दिवसांपूर्वीच त्यांच्या आईसह उत्तर प्रदेशातल्या प्रयागराजमधून भावाच्या लग्नासाठी कपडे खरेदी करण्यासाठी सुरतला पोहोचले होते.

**हत्याकांडामागचं कारण काय?**

बुधवारी रात्री उशिरा सुरत शहरातील उधना पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या पटेल नगर परिसरातल्या साई जलाराम सोसायटीमध्ये हा प्रकार घडला आहे. घटनेबद्दलची अधिकची माहिती अशी की, पत्नी आणि मुलासह याठिकाणी राहणाऱ्या ३४ वर्षांच्या संदीप घनश्याम गौर याने हे हत्याकांड केले आहे. संदीप त्याची पत्नी वर्षा गौर आणि तीन मुलांसह या घरात राहत होता. संदीपचा मेहुणा निश्चय अशोक कश्यप, त्याची बहीण ममता कश्यप व आई शकुंतला देवी यांच्यासह ४ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रयागराजहून सुरतला त्याच्या भावाच्या लग्नाची खरेदी करण्यासाठी आला होता. सुरतेत लग्नासाठी कपडे खरेदी करायला गेल्याने त्यांना जीवालाच मुकावे लागेल याची त्यांना कल्पनाही नसेन.

**बुधवारी रात्री...**

बुधवारी रात्री उशीरा घरात सर्वजण उपस्थित असताना संदीपने मेहुणा आणि सासूकडे मेव्हणीबरोबर लग्न करण्याची इच्छा व्यक्त केली. संदीपची ही इच्छा एकून घरातील सर्वांना धक्का धक्का बसला. या प्रकारामुळे कुटुंबात वादविवाद सुरु झाला. हळूहळू त्याचे स्वरुप भांडणात बदलले. त्यानंतर संदीप गौरने त्याचा मेहुणा निश्चय कश्यप, मेहुणी ममता कश्यप व सासू शकुंतला देवी यांच्यावर चाकूने हल्ला चढविला. मेहुणा व मेहुणी हे जागीच मृत पावले तर सासूला रुग्णालयामध्ये हलवण्यात आले. तिच्यावर उपचार सुरु आहेत. या गंभीर प्रकाराची माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनी मृत भावंडांचे मृतदेह ताब्यात घेतले व शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवले. पोलिस या प्रकरणी तपास करत आहेत, अशी माहिती सुरत पोलिस उपायुक्त डॉ. कानन देसाई यांनी दिली आहे.

## मेडिकल विद्यार्थिनी लेकीने खोलीत आयुष्य संपवलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, सोलापूर :** सोलापूर शहरात एक धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील जुळे सोलापूर भागातील एका उच्चभ्रू सोसायटीत वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवार ७ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास घडली आहे.

सोलापूर मधील डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या २५ वर्षीय साक्षी सुरेश मैलापुरे हिने अज्ञात कारणामुळे गळफास घेऊन आत्महत्या केली. सोलापूर शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिस तपास करत आहेत. पोलिस साक्षीचा मोबाईल जप्त करणार असून त्यामधून अधिकची माहिती समोर येईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. नातेवाईकांनी व शेजाऱ्यांनी साक्षीला बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष होण्यासाठी अजितदादा पवार यांचा भ्रष्टाचारास पाठबळ - पै.भोंडवे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, पुणे :** उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. वास्तविक भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या घटनेनुसार व नव्याने मंजुर झालेल्या स्पोर्ट्स कोड नुसार ३ टर्म अध्यक्षपद भुषवल्यानंतर आपणास ४ थ्या टर्मला अध्यक्ष होता येत नाही. परंतु सगळे नियम धुडकावत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर २०२५ रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला.

विशेष म्हणजे महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या घटनेमध्ये सुध्दा ३ टर्म नंतर अध्यक्ष होता येणार नाही असेच होते. परंतु मागे महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या कार्यकारणीस अंधारात ठेऊन महासचिवांनी घटनेमध्ये बदल करुन तो क्लॉज काढुन टाकला होता. परंतु भारतीय ऑलिंपिक असोसिएशनच्या नियमानुसार हे कृत्य बेकायदेशीर ठरण्याची शक्यता आहे.

**बेकायदेशीरपणे काही संघटनांना मतदानाचे अधिकार**

महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये कोणत्या नियमाने राज्य खेळ संघटनेस मतदानाचे अधिकार असावेत हे जाणुन बुजून निश्चित केले नसल्याने यामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. ज्या संघटनेत वादविवाद आहेत व प्रशासक नेमले आहेत जसे की कबड्डी, नेटबॉल, हॅन्डबॉल, तायक्वांदो यांना नियम डावलुन मतदान प्रक्रियेत सामावून घेतले आहेत. तर जलतरण, कराटे अशा काही संघटनांना निवडणुक प्रक्रियेतुन बाहेर ठेवण्यात आल्याने ही निवडणूक प्रक्रियेवर अनेक राज्य खेळ संघटनांनी नाराजी व्यक्त करत कोर्टाचे दरवाजे ठोठावण्याची तयारी केली आहे.

ही निवडणुक पुण्यामध्ये होणार असल्याचे जाहीर केले असताना अचानकपणे परीपत्रक काढुन मुंबई हे निवडणुकीचे ठीकाण निश्चित केल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

**भ्रष्टाचाराविरुद्ध आंदोलन व उपोषण**

३ नॅशनल गेम्स करीता शासनाकडुन देण्यात आलेला १२ कोटी ४५ लाख रुपये निधीचा हीशोब महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने शासनास सादर न केल्याने व त्या अनुदानामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असल्याची खात्री असल्याने दिनांक २३ सप्टेंबर रोजी पुणे येथे माजी खासदार रामदासभाऊ तडस यांच्या नेतृत्वाखालील आंदोलन घेण्यात आले होते. तसेच भारतीय जनता पार्टी क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीप भोंडवे यांनी ४ दिवस आमरण उपोषण केले होते. त्यावेळी क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांनी ऑलिंपिक असोसिएशनला पत्र काढुन ७ दिवसामध्ये हिशोब सादर करा अन्यथा कारवाई करु असे पत्र काढण्यात आलेले होते. तर आर्थिक गुन्हे अन्वेषण चे सहाय्यक आयुक्त विवेक मासाळ यांनी तात्काळ भ्रष्टाचाराची चौकशी सुरु करु असे आश्वासन दिले होते.

**अजितदादांचा भ्रष्टाचार प्रकरण दाबण्याचा प्रयत्न**

दिनांक २९ सप्टेंबर रोजी मा.अजितदादा पवार यांनी मुंबई येथील त्यांच्या दालनात महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली होती. त्या बैठकीमध्ये चर्चे दरम्यान त्यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक मासाळ यांना फोन करुन संबंधित तपास सुरु करण्याअगोदर माझी भेट घे असे जाहीरपणे सांगितले.

यामुळे पोलीस प्रशासनाचा तपास संथ झाला आहे. तसेच आयुक्त क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य यांनी हिशोब न आल्यानंतर प्रत्यक्ष कारवाई करण्याऐवजी क्रीडा मंत्रालयात पत्रव्यवहार करुन कारवाईची गती संथ केली आहे. महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार आहेत.

त्यामुळे ३ नॅशनल गेम्सकरीता घेतलेल्या १२ कोटी ४५ लाख रुपयांच्या हिशोबाची संपुर्ण जबाबदारी ही त्यांचीच आहे. २ ते ३ वर्ष होऊन सुध्दा अजून ही हिशोब सादर न झाल्याने यामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याची जाणीव अजितदादांना झाली आहे. परंतु महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकीमध्ये पुन्हा अध्यक्ष होण्याची मनिषा घेऊन उतरलेल्या अजितदादांना स्वतः अध्यक्ष होण्यासाठी काही पदाधिकाऱ्यांनी केलेल्या भ्रष्टाचारास ते जाणीवपूर्वक पाठीशी घालण्याचा प्रयत्न करत असून हे भ्रष्टाचार प्रकरण ते दाबण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु तसे महाराष्ट्रातील खेळाडु व राज्य संघटना यांना न्याय देण्यासाठी वेळेप्रसंगी कोर्टाचे दरवाजे ठोठावले जातील असा इशारा भारतीय जनता पार्टी क्रीडा आघाडीचे अध्यक्ष पै.संदीप भोंडवे यांनी दिला आहे.

## थोडक्यात बातम्या

### अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त गेगाव येथे कवितांचा कार्यक्रम

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.०९, शहापूर (ठाणे) :** गेगाव जिल्हा परिषद शाळा येथे कवी गोपाळ वेखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त कवितांचा एक सुंदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे प्रसिद्ध कवी मंगेश पाडगावकर यांच्या कवितांवर आधारित पाडगावकरांच्या कविताचे सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे अतिथी श.चं.स.विद्यालय किन्हवली शाळेचे मुख्याध्यापक कवी, लेखक, गोपाळ वेखंडे उपस्थित होते. गोपाळ वेखंडे यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र भोईर यांनी केले. कवी गोपाळ वेखंडे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे महत्त्व समजावून सांगितले आणि त्यांच्या गोड गळ्यातून मंगेश पाडगावकर यांच्या कवितांमधील गोडवा, भावना आणि जीवनदृष्टी यांची ओळख करून दिली. त्यांनी त्यांच्या खुमासदार शैलीत ये रे पावसा, सांग सांग भोलानाथ, झुक झुक झुक आगीनगाडी, नाच रे मोरा अशा लहान मुलांच्या बडबडगीतांपासून ते कणा सारख्या कवितांचे उत्तम सादरीकरण केले. त्यांच्या मनमोहक सादरीकरण शैलीमुळे विद्यार्थ्यांचे मनोरंजन झाले आणि विद्यार्थ्यांनी ही तालासुरात ठेका धरत उत्साहाने टाळ्यांच्या गजरात स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक कुंदन चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी गोपाळ वेखंडे यांचे आभार मानले आणि मराठी भाषा अधिक जोपासण्याचा संकल्प केला.

# चारोटी टोल नाक्यावर पोलिसांची मोठी कारवाई : महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा जप्त

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.०९, डहाणू (पालघर) :** नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या विशेष तपासणी मोहिमे दरम्यान तसेच दिवाळी नजीक आल्याने गुजरात राज्यातून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र राज्यात गुटखा तस्करी होत आहे. या अनुषंगाने डहाणू तालुक्यातील चारोटी टोल नाक्यावर पोलिसांनी मोठी कारवाई करत महाराष्ट्रात बंदी असलेला सुगंधित पान मसाला व गुटखा जप्त केला आहे.

गुजरातहून मुंबईकडे येणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यात आले असताना, संशयास्पद इनोव्हा क्रिस्टा (MH-४८-AQ-०१०१) या गाडीची तपासणी करण्यात आली. गाडीच्या काचांवर काळी फिल्म लावलेली असल्याने पोलिसांनी वाहनचालकाची चौकशी केली. मात्र चालकाने उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे संशय अधिक गडद झाला.

यानंतर कासा पोलिसांनी तपास वाढवला असता गाडीमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला सुगंधित पान मसाला आणि गुटखा आढळून आला. पोलिसांनी या मालासह एकूण ₹७,४७,६२३ किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणात गाडी चालक दिशान रमजावा शेख (वय २५, रा. वज्रेश्वरी) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याविरुद्ध इछड कलम १२३, २२३, २७४, २७५ तसेच अन्न व सुरक्षा मानके कायदा कलम २३, २७ आणि ३० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई महामार्ग पोलिस निरीक्षक संतोष खानविलकर, पोलीस नाईक वैभव शिंगाडे यांच्या सहकार्याने, कासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे व उपनिरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलिसांनी सांगितले की, या घटनेचा पुढील तपास सुरू असून गुटखा तस्करीच्या साखळीचा मागोवा घेण्यासाठी स्वतंत्र पथक कार्यरत आहे. महाराष्ट्रात गुटखा विक्री आणि वाहतुकीवर संपूर्ण बंदी असून, अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# चंद्रपूर जिल्ह्यातील प्रश्नांसाठी आ.मुनगंटीवारांनी घेतली महसूल प्रधान सचिवांची भेट

## कोठारी येथे अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाच्या पदभरतीची मागणी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांनी महसूल विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे यांची मुंबई येथे भेट घेऊन चंद्रपूर जिल्ह्यातील प्रलंबित महसूल विषयांवर सविस्तर चर्चा केली. दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय रेल्वे मंत्री ना.अश्विनी वैष्णव यांना भेटून चंद्रपूर जिल्ह्यातील विविध मुद्यांसंदर्भात आ. मुनगंटीवार यांनी निवेदन दिले. त्यानंतर आता महसूल प्रश्नांसंदर्भात प्रधान सचिवांची त्यांनी भेट घेतली. यावरून जिल्ह्यातील सर्व क्षेत्रांतील प्रश्न निकाली लावण्यासाठी आ. मुनगंटीवार सातत्याने प्रयत्नशील असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. विकास खारगे यांच्यासोबत झालेल्या भेटीत आ. मुनगंटीवार यांनी कोठारी येथे मंजूर झालेल्या अतिरिक्त तहसिलदार कार्यालयाच्या पदभरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली.

जिल्ह्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने ही पदभरती अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्ह्यातील ५२ तलाठी कार्यालयांमध्ये सुरू असलेली कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत, अशी सूचनाही त्यांनी केली. नागरिकांच्या दैनंदिन कामासंदर्भात निगडित असलेली ही कार्यालये प्रभावीपणे कार्यरत राहण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक साधनसामग्री आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकडे आ. मुनगंटीवार यांनी लक्ष वेधले. महसूल विभागाच्या विविध प्रलंबित विषयांबाबत सखोल आढावा घेण्यासाठी विकास खारगे यांनी स्वतः चंद्रपूर जिल्ह्याचा दौरा करावा, अशी विनंतीही आ. मुनगंटीवार यांनी या भेटीत केली. या दौऱ्यात स्थानिक अधिकाऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा होईल व जिल्ह्यातील महसूल विषयक प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास आ. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. या भेटी दरम्यान महसूल विभागाच्या संबंधित विविध विषयांवरही चर्चा झाली.



# अध्ययन एम.एस.डब्लू. विद्यार्थिनीच्या ग्रामीण अभ्यास शिबिराचे आयोजन

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.०९, चिंतलधाबा (चंद्रपूर) :** एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ चर्चगेट मुंबई येथील समाजकार्य विभागात अध्ययन नस्त एम.एस.डब्लू. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीच्या अभ्यासक्रमाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रामीण अभ्यास शिबिर. सदर शिबिराचे आयोजन दिनांक ०९ ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत चिंतलधाबा येथे करण्यात येणार आहे. या शिबिराचा उद्देश विद्यार्थ्यांना ग्रामीण जीवनाशी सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक रचना प्रत्यक्ष अनुभवातून समजून देणे स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्य गाव पातळीवरील प्रशासन व विकास प्रक्रिया याविषयी आकलन निर्माण करणे असा आहे. शिबिराच्या कालावधीत विद्यार्थिनी विविध क्षत्रिय उपक्रम सर्वेक्षण जनजागृती कार्यक्रम गटचर्चा तसेच गावकऱ्यांशी संवाद यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. सदर उपक्रम गावातील सामाजिक व सांस्कृतिक परंपरा चा आदर राखून राबवले जातील शिबिर कालावधीत संपूर्ण समन्वय ग्रामपंचायत व स्थानिक नागरिकांशी ठेवण्यात येईल. अशी माहिती आयोजांकडून देण्यात आली.

# लाड – पागे समितीच्या शिफारशीनुसार ४ सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नवी मुंबई महापालिकेत नेमणूक पत्र



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, नवी मुंबई :** महानगरपालिकेतील 'सफाई कर्मचारी' या संवर्गातील सेवानिवृत्त झालेल्या तसेच मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न तातडीने सुटावा व त्यांच्या कुटुंबास हातभार लागावा यादृष्टीने त्यांच्या वारसांना सेवेत सामावून घेण्याबाबत नवी मुंबई महानगरपालिका नियमितपणे कार्यवाही करत असते.

नुकताच मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील १५० दिवसांच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यांमध्ये आत्यंतिक संवेदनशीलता जपत ६ कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावरील नेमणूकपत्र देण्यात आले आहे. अशाच प्रकारची कर्मचारीहिताय कार्यवाही करत असतांना सेवानिवृत्त तसेच मयत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रतिक्षा यादीतील वारसांना 'लाड पागे समिती'च्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती देण्यात आली आहे. त्या अंतर्गत गट 'क' मध्ये एका उमेदवारास 'रोखपाल' या पदावर तसेच गट 'ड' मध्ये ३ उमेदवारांना 'सफाई कर्मचारी' या पदावर महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या संमतीने नियुक्तीपत्रे देण्यात आलेली आहेत. एकूण ४ उमेदवारांना प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. अक्षय बाळू शिरसाठ, सागर भगवान सुरडकर, जयदिप संतोष हिरवे तसेच आकाश सचिन तांबे या चार उमेदवारांनी नियुक्ती पत्र स्वीकारली.

महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासन विभागामार्फत सेवाविषयक बाबींवर नियमित व नियमोचित कार्यवाही करण्यात येत असून या कालबध्द अंगिकारलेल्या कार्यपद्धतीमुळे लाड - पागे समितीच्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची संख्या शून्यावर आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेने आपल्या सफाई कर्मचारी संवगातील कर्मचाऱ्यांबाबत जपलेल्या या संवेदनशील कृतीबद्दल उमेदवार व त्यांचे कुटुंबीय यांच्याकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात वायुसेना दिन साजरा

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०८, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात सैनिकी विज्ञान विभागातर्फे ९३ वा भारतीय वायुसेना दिन उत्साहात साजरा. मुक्रमाबाद येथे स्वामी विवेकानंद महाविद्यालयात ८ ऑक्टोबर हा भारतीय वायुसेना स्थापना दिवस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक जी. इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.एम. बिडवे उपस्थित होते. तर प्रमुख वक्ते शिवाजी कॉलेज, मुक्रमाबाद येथील भूगोल विभागाचे प्रमुख प्रा. गंगाधर वाघमारे तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.एस.एल सकनुरे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमात प्रमुख वक्त्यांनी भारतीय वायुसेनेचा ८ ऑक्टोबर हा स्थापना दिवस का साजरा केला जातो याविषयी माहिती दिली. तसेच भारतीय वायुसेनेचे युद्ध व शांतता काळातील योगदान याविषयी विशेष उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सैनिकी विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ.आर.बी.बाविस्कर यांनी केले. तर आभार प्रा.बी.डब्ल्यू बाळबुधे यांनी मानले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्राध्यापक डॉ. मा.म गायकवाड तसेच डॉ.आर.बी. मादळे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरील कार्यक्रमासाठी सेवक बालाजी सादगिरे यांनी परिश्रम घेतले.

# पनवेल मनपा अभय योजना; १५ ऑक्टोंबर पर्यंत ७५ टक्के सुट

**अक्षराज : जे.के.पोळ**





**दि.०९, पनवेल :** महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार १५ ऑक्टोंबर पर्यंत शास्तीवरती ७५ टक्के सुट देण्यात आली आहे. यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या अभय योजनेचा मालमत्ताधारकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. अभय योजनेंतर्गत आत्तापर्यंत सवलतीसह ५६६ कोटींचा कर पालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

याआधी महापालिकेने करदात्यांना शास्तीमध्ये तब्बल ९० टक्के सवलत होती. त्यानंतर आता १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर भरणाऱ्यांना ७५ टक्के शास्ती माफी मिळणार आहे. महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २ टक्के सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, शेड नेट, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २ टक्के सवलत दिली जाणार आहे.

याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार करात २ टक्के सवलत मिळणार आहे. कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TAX APP आणि Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे.

महापालिकेच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन दिलेल्या शास्तीमाफी व सवलतींचा लाभ घ्यावा.

कर-मित्र' चॅटबॉटची सेवा सुरूनागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगर पालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉट सेवा सुरू केली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवितो आहे. कर-मित्र चॅटबॉट द्वारे नागरिकांना खालील सेवा उपलब्ध होतील: मालमत्ता कराची थकबाकी त्वरित जाणून घेणे. आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून थेट कर भरता येणे. बिल, पावती व कर गणनेबाबत शंका निरसन. योजना, सवलत आणि अंतिम तारखांबाबत अद्ययावत माहिती.अधिक मदतीसाठी नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाइटवरील 'कर-मित्र' चॅटबॉट चा वापर करावा.

आतापर्यंत मालमत्ता कर भरलेल्या मालमत्ता : ९५ हजार ७८

अभय योजनेचे लाभार्थी : ६० हजार

२१३शास्ती माफ झालेली रक्कम : ११७ कोटी

# सेंट मायकल्स इंग्लिश स्कूल, चंद्रपूरचे कुस्ती खेळाडू राज्यस्तरावर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विभाग स्तरावरील १७ वर्षाखालील मुले, मुली व १४ वर्षाखालील मुले, मुली मध्ये सेंट मायकल्स इंग्लिश स्कूल चंद्रपूरचे कुस्ती खेळाडू यांनी नेत्रदिपक कामगिरी करून राज्यस्तरावर पोहोचले आहेत.

१७ वर्षे वयोगटाखालील मुलांच्या फ्री स्टाइल स्पर्धेत ६५ किलो वजन गटात युवराज अवघडे यांनी विजय प्राप्त केला. ग्रीको रोमन मध्ये मंथन राऊत यांनी ४५ किलो वजन गटात, तर स्वप्निल कढवे यांनी ७१ किलो वजन गटात विजय प्राप्त करून राज्यस्तरावर पोहचलेले आहेत . १४ वर्षाखालील मुला, मुलींच्या फ्री स्टाईल स्पर्धेमध्ये दक्ष ठोंबरे यांनी ४४ किलो वजन गटांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करून राज्य स्तरावर पोहचलेला आहे. तर मुलींमध्ये सौम्या चापले ३३ किलो वजन गटांमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. ३० किलो वजन गटांमध्ये आरोही मानकर हिने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये सेंट मायकल्स इंग्लिश स्कूलचे खेळाडू दरवर्षी विभाग स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करून राज्यस्तरावर पोहचत आहेत. यावर्षी सुद्धा इंग्लिश स्कूलच्या खेळाडूंनी कुस्तीमध्ये नेत्रदिपक कामगिरी करून चार कुस्ती खेळाडू राज्यस्तरावर पोहोचलेले आहे. ज्यूबली हायस्कूल कुस्ती प्रशिक्षण केंद्र कुस्ती मार्गदर्शक धर्मशील कातकर, विठ्ठल मंदिर व्यायाम शाळेचे कुस्ती मार्गदर्शक भूपेंद्र अवघडे यांचे मार्गदर्शन लाभत आलेले आहे.

तसेच शाळेतील क्रीडा शिक्षक सुनील वडस्कर, नेहा बसेशंकर यांचेकडून नेहमी कुस्ती खेळाडूंना प्रोत्साहन मिळालेले आहे. कुस्ती खेळाडूंनी विभाग स्तरावर नेत्रदिपक कामगिरी करून राज्यस्तरावर पोहचल्याबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विकास कोल्हेकर, उपप्राचार्य सुधीर सिंग यांनी विभागस्तरावर यश संपादन केल्याबद्दल कुस्ती खेळाडूंचे अभिनंदन करून राज्यस्तराकरिता शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या.





# उपसरपंच वेडगा यांच्या वाढदिवसानिमित्त बस थांब्याची सुविधा उभारणी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०९, डहाणू (पालघर) :** सामाजिक बांधिलकी जपत आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत किराट ग्रामपंचायतीचे उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते शैलेश वेडगा यांनी प्रवाशांच्या सोयीसाठी बस थांबा उभारून आदर्श निर्माण केला आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागात आजही शाळकरी विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच कामगार वर्ग बससेवांवर अवलंबून आहे. मात्र अनेक ठिकाणी बस थांब्याजवळ बसण्याची सोय नसल्याने प्रवाशांना उन्हात, पावसात आणि वाऱ्यात उभे राहून बसची वाट पाहावी लागते.

या गैरसोयीची जाणीव होताच वेडगा यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक दृष्टिकोनातून पुढाकार घेतला आणि स्वखर्चातून किराट (वेडगी पाडा) येथे आकर्षक बस थांबा बांधून दिला. या बस थांब्यामुळे परिसरातील किराट, बोरशेती तसेच आसपासच्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. पावसाळा असो वा उन्हाळा, आता प्रवाशांना सोयीस्कर ठिकाणी आसरा मिळणार आहे. या सामाजिक उपक्रमाचे उद्घाटन स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठित ज्येष्ठ व्यक्ती दिनेश पावडे, उद्योजक दयानंद पावडे, रविंद्र वडाळी, विजय उघडे, सामाजिक कार्यकर्ते परेश पावडे, बोरशेती सरपंच महरेश भुतकडे, गोवाडे सरपंच ईश्वर बरड, उद्योजक गणेश वरठा, रोशन गवळी, उद्देश सवरा, विश्वास पावडे, अशोक नलावडे, गणेश पावडे, गोकुळ वेडगा, विजय वेडगा, रुशीकेश पावडे, पपेश लंहागे, नितीन डगळा, काळुराम पवार, स्वप्निल राव, नागेश वेडगा, राकेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित सर्वांनी शैलेश वेडगा यांच्या सामाजिक दायित्वाची प्रशंसा केली व अशा उपक्रमातून इतरांनीही प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त केले.





# विठ्ठलवाडी पोलिसांनी गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपीला घेतले ताब्यात

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**



**दि.०९, कल्याण (ठाणे) :** विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दाखल झालेल्या गंभीर गुन्ह्यातील पाहिजे आरोपीला पोलिसांनी सापळा रचून अखेर ताब्यात घेतले आहे. विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ६४०/२५ बी.एन.एस. कलम १०९, ३५२, ३५१(२), ३५१(३), ३२४(४), २९६ सह आर्म्स ॲक्ट कलम ४, २५ प्रमाणे दि. २३ सप्टेंबर २०२५ रोजी दाखल गुन्ह्यातील आरोपी अजय दादाराव बागुल (वय २६, रा. राहुल नगर, बुद्धवाडा, न्यू टेलिफोन एक्सचेंज जवळ, गोल मैदान, उल्हासनगर-२) हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. दरम्यान, आरोपी बिस्किट कंपनी जवळ, सूर्या लॉजच्या पाठीमागे, उल्हासनगर-४ परिसरात दिसत असल्याची माहिती पो.हवा. ६६ सुजित निचिते यांना मिळाली. त्यांनी ही माहिती वरिष्ठांना कळवून डीबी पथकासह सापळा रचला आणि आरोपी अजय बागुल यास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने सदर गुन्हा केल्याचे कबूल केले असून त्याला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक अशोक कोळी व पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**कारवाईत सहभागी पथक :**

पो. हवा. ६६ सुजित निचिते, पो.हवा. ६३१९ हरिश्चंद्र घाणे, पो.शि. ७२९८ सुनील गावित, पो.शि. ३६२१ प्रदीप बुरकुल, पो.शि. ८२४४ हनुमंत सानप, पो.शि. ४३०० मंगेश वीर विठ्ठलवाडी पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.